शुध्दीपत्रक भूसंपादन अधिनियम,१८९४ मधील कलम १८ अंतर्गत मा.दिवाणी न्यायालयाच्या निर्णयाविरुध्द वरिष्ठ न्यायालयात अपीला बाबतच्या कार्यवाहीचे निकष.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन शुध्दीपत्रक क्रमांकः संकीर्ण -२०१४/प्र.क्र.४१/ भाग-१/ अ-४
हुतात्मा राजगुरु चौक
मादाम कामा मार्ग, मंत्रालय मुंबई-३२
तारीख: ११ मे, २०१८.

<u>**वाचा**</u>: १) शासन निर्णय,महसूल व वन विभाग, मंत्रालय क्र.एलक्युएन-०१/२०११/प्र.क्र.३०/अ-२,दि.१३.१०.२०११ व शुध्दीपत्रक, दि.१८.२.२०१२.

२) जिल्हाधिकारी नागपुर यांचे.पत्र क्र.एलएसी/कार्या-२५/कावि-७/२०१७, दि.२०.०४.२०१७ चे पत्र.

३) शासन निर्णय, महसूल व वन विभाग, मंत्रालय, समक्रमांक दि.०३.११.२०१६ व शुध्दीपत्रक दि.२३.०२.२०१७ व दि. ४.०५.२०१७

४) कार्यकारी संचालक महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ यांचे पत्र दि. १७.१०.२०१७.

शासन शुध्दीपत्रक :-

कार्यकारी संचालक महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ यांचे दि. १७.१०.२०१७ रोजीच्या पत्राच्या अनुषंगाने जलसंपदा विभागाने सुचविलेल्या सुधारणा विचारात घेऊन शासन निर्णय दि. ३.११.२०१६ मधील निकष १ मध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे.

उपरोक्त संदर्भाधिन शासन निर्णय क्र.३ मध्ये नमूद निकषापैकी निकष क्र.१ मध्ये खालीलप्रमाणे नमुद आहे.

" मा.दिवाणी न्यायालयातील कलम १८ खालील भूसंदर्भातील जमिनीचा कलम ४ च्या अधिसूचनेच्या दिनांकास प्रचलित रेडीरेकनर दर विचारात घेता, वाढीव मोबदल्याच्या आदेशातील रक्कम जर नागरी भागात दुप्पट व ग्रामीण भागात चौपट या मर्यादेत (व्याज, सोलेशियम इत्यादी वगळून) येत असेल तर मा.दिवाणी न्यायालयाच्या निर्णयाविरुध्द वरिष्ठ न्यायालयात अपीलात जाण्याची आवश्यकता नाही. " च्या ऐवजी

" मा.दिवाणी न्यायालयातील कलम १८ खालील भूसंदर्भातील जमिनीचा कलम ४ च्या अधिसूचनेच्या दिनांकास प्रचलित रेडीरेकनर दर विचारात घेता, वाढीव मोबदल्याच्या आदेशातील रक्कम जर नागरी भागात दुप्पट व ग्रामीण भागात चौपट या मर्यादेत (व्याज, सोलेशियम इत्यादी वगळून) येत असेल तर मा.दिवाणी न्यायालयाच्या निर्णयाविरुध्द वरिष्ठ न्यायालयात अपीलात जाण्याची आवश्यकता नाही. परंतू असे कि दि. ३.११.२०१६ पूर्वी मा. न्यायालयाने दिलेल्या न्यायनिर्णयाविरूध्द अगोदरच अपील न करण्याबाबत निर्णय घेण्यात आला असेल तर अशा न्याय निर्णयाविरूध्द अन्यथा सबळ कारण नसल्यास अपील दाखल करण्याची आवश्यकता नाही. याबाबतचा निर्णय संबंधित भुसंपादन संस्थेने गुणवत्तेनुसार घ्यावा." असे वाचावे.

तसेच, उपरोक्त संदर्भाधिन शासन निर्णय क्र.३ मध्ये नमूद निकषापैकी निकष क्र.३ मध्ये खालीलप्रमाणे नमुद आहे.

" उपरोक्त निकष क्रमांक १ मध्ये नमूद केलेल्या प्रकरणांखेरीज, उर्वरित प्रकरणांसाठी संबंधित संपादक संस्थेने संबंधित जिल्हाधिकारी यांना प्राधिकृत करावे. संबंधित जिल्हाधिकारी यांनी विधी व न्याय विभागाच्या सल्ल्याने तातडीने तपासणी करुन वरिष्ठ न्यायालयात अपील दाखल करण्याच्या आवश्यकतेबाबत गांभीर्याने व जाणीवपूर्वक निर्णय तातडीने घ्यावा."

<u>या ऐवजी</u>

"उपरोक्त निकष क्रमांक १ मध्ये नमूद केलेल्या प्रकरणांखेरीज, उर्वरित प्रकरणांसाठी संबंधित संपादक संस्थेने त्यांचे अधिनस्त विधी अधिकाऱ्याच्या सल्ल्याने त्यांचे स्तरावर तातडीने तपासणी करुन वरिष्ठ न्यायालयात अपील दाखल करण्याच्या आवश्यकतेबाबत गांभीर्याने व जाणीव पूर्वक निर्णय तातडीने घ्यावा व त्याबाबत संबंधित जिल्हाधिकारी यांना अवगत करावे. परंतु असे कि ज्या संपादन संस्था जसे कि शासनाची विविध महामंडळे / प्राधिकरणे, शासनाचे विविध अधिनियमानुसार स्थापन /अस्तित्वात आली आहेत, त्या संपादन संस्थांनी देखिल त्यांचेकडील निश्चित धोरणानुसार त्यांचे स्तरावर निर्णय घ्यावा व त्याबाबत संबंधित जिल्हाधिकारी यांना अवगत करावे." असे वाचावे.

सदर शासन शुध्दीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०१८०५१११७०५४९०५१९ असा आहे. हे शुध्दीपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Asha Shailesh Dahake

Digitally signed by Asha Shailesh Dahake
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue and Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=bdc3a70507686db48462c677bbbc5032947f8b7f5be3fb7ff1eaf137f7771f4b, cn=Asha Shailesh Dahake
Date: 2018.05.11 17:07:59 +05'30'

(आशा डहाके)
सहायक संचालक तथा अवर सचिव,
महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
२. मा.मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा.राज्यमंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४. अप्पर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
५. प्रधान सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई
६. प्रधान सचिव (विधी व परामर्शी) विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई
७. प्रधान सचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
८. सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/ सचिव, मंत्रालय, मुंबई
९. सहसचिव, विधी व न्याय विभाग, औरंगाबाद/नागपूर
१०. सर्व विभागीय आयुक्त
११. सर्व जिल्हाधिकारी
१२. भूसंपादन कार्यासन - अ-१, अ-२ व अ-३
१३. निवडनस्ती- अ-४